आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१५ जुलै २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून निर्माण झालेला तणाव निवळण्यासाठी पुढाकार घेण्याचं छगन भुजबळ यांचं शरद पवार यांना आवाहन
- घाऊक किंमतीवर आधारित चलनफुगवट्याचा दर गेल्या महिन्यात ३ पूर्णांक ३६ शतांश टक्क्यांवर
- मुंबई शेअर बाजारात चढउतार / सेन्सेक्स ८० हजार ८६३ अंकांची उंची गाठल्यानंतर १४६ अंकांची वाढ नोंदवत ८० हजार ६६ अंकांवर बंद

**आणि**

- राज्यात हा आठवडाभर कमी आधिक प्रमाणात पाऊस पडण्याची शक्यता

**<><><><><>**

मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून राज्यात तयार झालेला तणाव निवळण्यासाठी शरद पवार यांनी पुढाकार घ्यावा, असं आवाहन मंत्री छगन भुजबळ यांनी केलं आहे. त्यांनी आज मुंबईत शरद पवार यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतल्यानंतर भुबातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली. आजच्या भेटीमागे कोणताही राजकीय हेतू नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. येत्या दोन दिवसांत आपण या विषयावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करू, तसंच राज्यातल्या प्रमुख नेत्यांशी चर्चा करून हा प्रश्न कसा सोडवता येईल ते पाहू, असं पवार यांनी म्हटल्याचं भुजबळ यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशात अन्नधान्य, विशेषतः भाज्या आणि उत्पादनांच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे घाऊक किंमतीवर आधारित चलनफुगवट्याचा दर गेल्या महिन्यात ३

पूर्णांक ३६ शतांश टक्क्यांवर गेला आहे. यात सलग चौथ्या महिन्यात वाढ नोंदवण्यात आली. हा दर मे महिन्यात २ पूर्णांक ६१ शतांश टक्के इतका होता.

<><><><><>

प्रस्तावित महाराष्ट्र जनसुरक्षा कायद्याच्या आधारे शहरी नक्षलवादाच्या नावाखाली पुरोगामी चळवळींना लक्ष्य करण्याचा सरकारचा उद्देश आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केला आहे. ब्रिटिश सरकारनं स्वातंत्र्यपूर्व काळात आणलेल्या रैलेट ॲक्टच्या धर्तीवर आधारलेला हा कायदा सरकार अध्यादेशाद्वारे आणत असल्याचं पाटील यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे. या कायद्याद्वारे पोलिसांना अमर्याद अधिकार दिले जाणार असून कोणतंही कारण न दाखवता ते एखाद्या संघटनेला ‘बेकायदेशीर’ म्हणून घोषित करू शकणार असल्याचं पाटील यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

काँग्रेस पक्षाच्या महिला सदस्यांनी देशातल्या ७० कोटी महिलांचा आवाज व्हायला हवं, असं आवाहन अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या अध्यक्ष अलका लांबा यांनी केलं आहे. अलका लांबा यांनी आज मुंबईत टिळक भवन इथं महिला प्रदेश काँग्रेसच्या विस्तारित कार्यकारिणीच्या बैठकीत मार्गदर्शन केलं त्यावेळी त्या बोलत होत्या.

महाराष्ट्रात कल्याणमध्ये एका महिलेची सामुहिक बलात्कारानंतर हत्या केल्याच्या घटनेबद्दल त्यांनी संताप व्यक्त केला, महिलांवरच्या अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ होत आहे, अशा महिलांचा काँग्रेसच्या पदाधिकारी महिला नेत्यांनी आवाज व्हावं असं त्या म्हणाल्या.

लोकसभेत भाजपाचा विजयरथ महाराष्ट्रानं रोखला, हा डबल इंजिन सरकारला इशारा आहे, आता काँग्रेसच्या महिला पदाधिकाऱ्यांनीही संघटनेला बळकट करण्यासाठी झोकून काम करावं, आणि विधानसभा निवडणुकीत विजय मिळवून द्यावा असं  त्या म्हणाल्या.

**<><><><>**

जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त आज नाशिकमध्ये पालकमंत्री दादा भुसे यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात ७०० शिकाऊ उमेदवारांना नियुक्तीपत्रांचं वाटप करण्यात आलं. १७ अनुकंपाधारकांना देखील आज नियुक्तीपत्र देण्यात आली. युवकांनी या  रोजगाराचा अनुकुल वापर करून लोकसेवा करावी, असं आवाहन दादा भुसे यांनी यावेळी केलं.

त्यांनी आज नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा आढावाही घेतला. हा योजना राज्यशासनाची क्रांतिकारी योजना असून महिलांचं आरोग्य, पोषण आणि स्वावलंबनासाठी ही महत्त्वाकांक्षी योजना मिशन मोड पध्दतीनं  राबवावी, अशी  सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

**<><><><>**

दुधाला प्रतिलीटर ४० रुपये भाव तसंच रास्त आणि किफायतशीर दर-एफआरपी देण्याच्या प्रमुख मागणीसाठी दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या वतीनं राज्यभरात आजपासून २१ जुलैपर्यंत तीव्र आंदोलनं करण्यात येणार आहे. शेतकरी संघर्ष समितीचे समन्वयक अजित नवले यांनी ही माहिती दिली.

या आंदोलनाचा भाग म्हणून अहमदनगर जिल्ह्यात कोतुळ इथले शेतकरी गेले दहा दिवस धरणं आंदोलन करत आहेत. आंदोलनाच्या आजच्या दहाव्या दिवशी

कोतुळ बाजारपेठ बंद ठेवण्यात आली. मध्यवर्ती चौकात बांधलेली दुधाची हंडी अभंग आणि भजनाच्या निनादात शेतकरी कार्यकर्त्यांनी फोडली. यावेळी सरकारच्या धोरणांचा निषेध करण्यात आला.

<><><><><>

शेअर बाजारात आज चढउतार झाले. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज सकाळी शुक्रवारच्या तुलनेत १६७ अंकांनी वर उघडला. दुपारपर्यंत बाजार चढे होते. त्यादरम्यान मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकानं एकदा ८० हजार ८६३ अंकांची नवी उंची गाठली होती. तर, राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २४ हजार ६३५ उंचीवर पोचला होता. मात्र ही उंची शेवटपर्यंत टिकली नाही.

दिवसअखेर सेन्सेक्स १४६ अंकांची वाढ नोंदवत ८० हजार ६६५ अंकांवर बंद झाला. तर, राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ८५ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार ५८७ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

मध्य महाराष्ट्रात उद्यापर्यंत अतिजोरदार पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर, पालघर आणि ठाणे या जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

कालपासून सुरु असलेल्या पावसामुळे मुंबईत सखल भागात पाणी साचल्यानं वाहतुकीवर परिणाम झाला. कोकण रेल्वेमार्गावर दिवाणखवटी ते विन्हेरे स्थानकांदरम्यान काल कोसळलेली दरड काढण्यात जवळपास २४ तासांनी यश आलं आहे. त्यामुळे लवकरच या मार्गावरची वाहतूक सुरू होईल. तसंच रत्नागिरी जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे विस्कळीत झालेली रस्ते वाहतूकही सुरळीत झाली आहे. दुपारनंतर पाऊसही ओसरला आहे. यामुळे मुंबई-गोवा आणि मिऱ्या कोल्हापूर

राष्ट्रीय महामार्ग, तसंच राजापूर-कोल्हापूर आणि चिपळूण-कराड मार्गावरची वाहतूक पूर्वपदावर आली आहे.

**रत्नागिरी** जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. खेड तालुक्यातल्या जगबुडी नदीच्या पाणीपातळीत घट होऊन ती आता धोकापातळीच्या खाली आली आहे. राजापूरमधली कोदवली आणि लांज्यातली मुचकुंदी या नद्या इशारा पातळीच्या वरून वाहत आहेत. मात्र, आता पावसाचा जोर ओसरल्याने पाणीपातळीही कमी होऊ लागली आहे. अतिवृष्टीमुळे आज जिल्ह्यातल्या सर्व शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. कालच्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात लांजा आणि राजापूर तालुके वगळता इतर सर्व तालुक्यांमध्ये मिळून सुमारे २ कोटी ६० लाख रुपयांचं नुकसान झालं आहे. ११ गायी-म्हशींचा मृत्यू झाला असून घरं, गोठे, तसंच खासगी आणि सार्वजनिक मालमत्तांचंही नुकसान झालं आहे.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात आज पावसाचा जोर कायम असल्यानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. दरम्यान, गेल्या रविवारी मागणाववरून पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या इसमाचा मृतदेह आज सकाळी कुडाळजवळ नदीत आढळून आला.

**जालना** शहरासह जिल्ह्याच्या बहुतांश भागात आज दुपारी मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. या भागात जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**भंडारा** जिल्ह्यात मोहाडी तालुक्यातल्या आंदळगाव इथं रोवणी करत असताना अंगावर वीज पडून कलाबाई गोखले आणि अशा सोनकुसरे या दोघींचा मृत्यू झाला, तर चार जण जखमी झाले आहेत. जखमींना मोहाडी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

राज्यात समाधानकारक पाऊस झाल्याने खरीपाच्या पेरणीला पोषक वातावरण तयार झालं आहे. त्यामुळे शेतात पेरण्यांना वेग आला असून अनेक ठिकाणी पेरणीची कामं उरकत आली आहेत.

नाशिक जिल्ह्यात ६ लाख हेक्टरपेक्षा जास्त खरीपाचं क्षेत्र असून यापैकी चार लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. येवला तालुक्यातली खरीपाची पेरणी पूर्ण असून इतर तालुक्यातही ८५ टक्के पेरण्या झाल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

पालघर जिल्ह्यात पावसाचं प्रमाण चांगलं असल्यामुळे भात पिकाच्या लागवडीसाठी अनुकूल वातावरण तयार झालं आहे. जिल्ह्यात पावसाने आज थोडी उघडीप दिल्यानं शेतकऱ्यांनी भात लागवडीला सुरुवात केली.

**<><><><><>**

संसदेत घुसखोरी प्रकरणी दिल्ली पोलिसांनी अमोल शिंदे याच्यासह मनोरंजन डी, ललित झा, महेश कुमावत, सागर शर्मा आणि नीलम आझाद या सर्व सहा आरोपींच्या विरोधात आरोपपत्र दाखल केलं आहे. या सर्व आरोपींना दोन ऑगस्ट रोजी न्यायालयात हजर करून सुनावणी होणार आहे. या सर्वांनी १३ डिसेंबर २०२३ रोजी संसदेत घुसखोरी केली, तसंच लोकसभेचं कामकाज चालू असतांना प्रेक्षकदीर्घेतून दालनात उतरत, धुराचे डबे फोडले होते.

**<><><><><>**

म्हाडाच्या छत्रपती संभाजीनगर मंडळाच्या अखत्यारीतल्या छत्रपती संभाजीनगर शहर तसंच जिल्ह्यासह लातूर, जालना, नांदेड, हिंगोली, परभणी आणि धाराशिव इथल्या १ हजार १३३ सदनिका आणि ३६१ भूखंडांच्या विक्रीसाठी १६ जुलै २०२४ ला संगणकीय सोडत काढण्यात येणार आहे. ही

प्रक्रिया सकाळी ११.०० वाजता छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते पार पडणार आहे.

या सदनिका अत्यल्प, अल्प आणि मध्यम उत्पन्न गटासाठी तर भूखंड सर्वांसाठी उपलब्ध आहेत. ही सोडत IHLMS 2.0 या नवीन संगणकीय प्रणालीद्वारे पार पाडली जाणार असून विजेत्या अर्जदारांची यादी म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या वेबसाईटवर सोडतीच्या दिवशी सायंकाळी ६.०० नंतर प्रसिद्ध केली जाणार आहे. त्याशिवाय विजेत्या अर्जदारांना एसएमएसद्वारेही या बाबतची माहिती पाठवली जाणार आहे.

**<><><><><>**

नीट यूजी अर्थात, पदवीपूर्व वैद्यकीय प्रवेश पात्रता परीक्षा पेपर फुटीप्रकरणी राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं नव्यानं दाखल केलेल्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयानं आज संबंधित याचिकाकर्त्यांना नोटीस जारी केली. याप्रकरणी काही विद्यार्थ्यांच्या याचिका राजस्थान उच्च न्यायालयापुढे प्रलंबित आहेत. त्या सर्वोच्च न्यायालयाकडे वर्ग कराव्यात, असं राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या याचिकेत म्हटलं आहे. त्यावर सर्वोच्च न्यायालयानं, ही नोटीस बजावली आहे. मात्र राजस्थान उच्च न्यायालयापुढच्या प्रलंबित कार्यवाहीला स्थगिती देणारा औपचारीक आदेश जारी करायला सर्वोच्च न्यायालयानं नकार दिला.

**<><><><><>**

राज्यात हा आठवडाभर कमी आधिक प्रमाणात पाऊस पडण्याची शक्यता आहे. गेल्या चोवीस तासात राज्यातल्या सर्व विभागांमधे बहुतांश ठिकाणी पाऊस पडला. कोकणात तरळक ठिकाणी अतिशय जोरदार, मध्य महाराष्ट्र आणि

विदर्भात काही ठिकाणी जोरदार, तर तुरळक ठिकाणी अति जोरदार पाऊस पडला. मराठवाड्यातही तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला.

उद्याही राज्यातल्या चारही विभागांमधे बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

या काळात मुंबई शहर आणि उपनगरात मध्यम ते जोरदार पाऊस पडेल, काही ठिकाणी अतिशय जोरदार पाऊस पडण्याची शक्यता कुलाबा वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//